**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम**

देखभाल दुरुस्ती खर्चाची काही प्रमाणात प्रतिपूर्ती करण्यासाठी ग्राम पंचायती, जिल्हा परिषदा व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून चालविण्यात येणा-या स्वतंत्र व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांसाठी **देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान** देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक ग्रापापु १००७/प्र.क्र.२३३/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक २० मे, २००८**

**वाचा :-** (१) शासन आदेश, ग्राम विकास विभाग क्र.ग्रापापु १०८५/सीआर ७८०३/३९, दिनांक १७ नोव्हेंबर, १९८६
(२) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि. क्रमांक ग्रापापु १०९८/प्र.क्र.२११/पापु-०७ दिनांक १४ डिसेंबर १९९८
(३) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि. क्रमांक ग्रापापु १०९९/प्र.क्र.३२८/पापु-०७ दिनांक २७ जुलै,२०००
(४) शासन अधिसूचना, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.व्हीपीएम. २०००/प्र.क्र.१३६३/२२, दिनांक १७ जानेवारी २००२
(५) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि. क्रमांक ग्रापापु १००२/प्र.क्र.६३९/पापु-०७ दिनांक २२ मे २००३
(६) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि. क्रमांक ग्रापापु १००३/प्र.क्र.२५६/पापु-०७ दिनांक १० जुलै,२००६

**प्रस्तावना :**

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी शासनाने संदर्भ क्र. १ येथील दि. १७ नोव्हेंबर, १९८६ च्या आदेशान्वये जिल्हा परिषद स्तरावर **जिल्हा देखभाल दुरुस्ती निधीची** स्थापना केलेली आहे. या देखभाल दुरुस्ती निधीमध्ये जिल्हा परिषदेने तिच्या विशिष्ट वार्षिक उत्पन्नाच्या २० टक्के रक्कम दरवर्षी जमा करणे बंधनकारक करण्यात आले आहे. याबरोबरच जिल्हा परिषदेकडून चालविण्यात येणाऱ्या प्रादेशिक योजनांच्या पाणी पट्टी वसूलीच्या रकमा देखील या निधीत जमा करणे आवश्यक आहे. या जमा रकमांमधून जिल्हा परिषदेने प्रादेशिक योजनांच्या देखभाल दुरुस्ती व महत्वाच्या दुरुस्त्यांची कामे पूर्ण करणे गरजेचे आहे.

२. संदर्भ क्र.२ येथील दि. १४ डिसेंबर, १९९८ च्या शासन निर्णयान्वये ग्रामपंचायत स्तरावर **ग्राम पाणी पुरवठा निधीची** स्थापना करण्यात आलेली आहे. या निधीमध्ये जमा करावयाच्या रकमा व त्यातून करावयाचा खर्च या बाबत सुस्पष्ट सूचना या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत.

३. संदर्भ क्र. ३ येथील दि. २७ जुलै, २००० च्या शासन निर्णयान्वये राज्यामध्ये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम, मागणी आधारित पुरवठा आणि समूहसहभागाच्या तत्वावर राबविण्यात येत आहे. या धोरणानुसार योजनेची **निवड, आखणी व अंमलबजावणी** ही संबंधित गावच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत करावयाची आहे. तर, योजनेच्या देखभाल व दुरुस्तीवरील १०० टक्के खर्च संबंधित लाभार्थ्यांनी करावयाचा आहे. शासन यंत्रणेचा यामधील सहभाग हा

**सहाय्यकर्त्याचा** राहणार आहे. शासनाची सहाय्यकर्त्याची भूमिका जिल्हा परिषदेमार्फत राबवावी असे धोरण ठरविण्यात आले आहे.

४. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची १०० टक्के देखभाल दुरुस्ती ग्रामस्थांनीच स्वखर्चाने करावी व त्यासाठी त्यांनी पाणीपट्टीव्दारे निधी उपलब्ध करुन घ्यावा यासाठी संदर्भ क्र ४ येथील शासन अधिसूचना, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, दिनांक १७ जानेवारी, २००२ अन्वये **पाणीपट्टी वरील कमाल मर्यादा काढून टाकण्यात आली आहे.** ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या वार्षिक देखभाल दुरुस्ती खर्चाचा अंदाज घेऊन त्याअनुषंगाने पाणी पट्टीची आकारणी करणे, आकारलेल्या पाणीपट्टीची जास्तीतजास्त वसूली होईल यासाठी प्रयत्न करणे ही संबंधित जिल्हा परिषद / ग्रामपंचायतीची जबाबदारी आहे. जेणेकरून योजना स्वयंसंतुलित होतील.

५. संदर्भ क्र. ५ येथील दि. २२ मे, २००३ च्या शासन निर्णयान्वये स्वतंत्र गावच्या तसेच प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी सुटसुटीत व पारदर्शक पद्धती विहित करण्यात आली आहे.

६. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी केंद्र शासन पुरस्कृत वर्धीत वेग कार्यक्रमाखाली उपलब्ध होणाऱ्या अनुदानाच्या १५ टक्के व राज्यस्तरावरून ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी उपलब्ध होणाऱ्या निधीतून १५ टक्के निधी राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी उपलब्ध करून देण्यात येतो. यामध्ये केंद्र शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीचा हिस्सा मोठा आहे. भविष्यात केंद्र शासनाच्या केंद्र पुरस्कृत वर्धितवेग कार्यक्रमाच्या धोरणात काही बदल झाल्यास देखभाल दुरुस्ती अनुदानावर त्याचा विपरित परिणाम होऊ शकतो. ही बाब विचारात घेता ग्रामीण पाणी पुरवठा योजनाचे शासनावरील अवलंबित्व कमी करून त्या जास्तीतजास्त स्वयंसंतुलित करणे गरजेचे झाले आहे.

७. मागणी आधारित समूहसहभागाच्या धोरणाची अंमलबजावणी करताना ज्या योजनांना नैसर्गिक परिस्थितीमुळे दुरुन पाणी आणावे लागते अशा योजनांना देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान मिळण्यासाठी संदर्भ क्र.६ येथील शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार पाणी पट्टीची योग्य आकारणी व प्रभावी वसूली करण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या जिल्हा परिषदांना / ग्राम पंचायतींना प्रोत्साहित करण्यासाठी या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या स्वतंत्र व प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी सन २००६-०७ या आर्थिक वर्षापासून देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान सुरु केलेले आहे.

८. पाणीपट्टीची योग्य आकारणी करणाऱ्या व त्या अनुषंगाने वसूली करणाऱ्या सर्व गावे / वाड्यांना या अनुदानासाठी पात्र ठरता यावे, तसेच सर्व जिल्ह्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात, त्या त्या जिल्ह्यातील डोंगराळ क्षेत्राच्या प्रमाणात योग्य हिस्सा मिळावा, पिण्याच्या पाणी पुरवठ्यासाठी हातपंपावर व विद्यूतपंपावर अवलंबून असलेल्या गावे / वाड्यांना देखील या अनुदानाचा लाभ व्हावा या अनुषंगाने या अनुदानासाठीच्या पात्रतेच्या प्रचलित निकषांमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तर पात्र ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान मिळण्याच्या सुत्रात सुलभता आणण्याची बाब देखील शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः**

आर्थिक वर्ष २००८-०९ पासून राज्याच्या ग्रामीण भागातील ज्या ग्रामपंचायती या शासन निर्णयातील अनुक्रमे **परिशिष्ट-१** मधील अटींची पुर्तता करतील अशा ग्रामपंचायतीना **परिशिष्ट-३ मध्ये** विहित केलेल्या सुत्रानुसार **देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान** देण्यास शासन मान्यता देत आहे.

२.	देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान हा वसूलीचा विकल्प नसून, योग्य पाणीपट्टीची आकारणी करून योजना / पाणी पुरवठा व्यवस्था स्वयंसंतुलित होतील यासाठी ग्रामपंचायतींनी / जिल्हा परिषदांनी प्रामाणिक प्रयत्न करावा. देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानाचा वापर गावातील पाणी पुरवठा योजनांच्या / व्यवस्थांच्या सुधारणांकरिता अधिकाधिक करावा.

३.	प्रत्येक वित्तीय वर्षात देखभाल दुरुस्तीसाठी राज्यस्तरावर उपलब्ध असलेल्या एकूण निधीपैकी ८० टक्के निधी सर्व जिल्ह्यांसाठी त्यांच्या ग्रामीण लोकसंख्येच्या प्रमाणात राखून ठेवण्यात येईल. तर उर्वरित २० टक्के निधी डोंगराळ जिल्ह्यांसाठी त्यांच्या ग्रामीण डोंगराळ लोकसंख्येच्या प्रमाणात अतिरिक्त म्हणून राखून ठेवण्यात येईल. जिल्हयाचा अनुज्ञेय निधी ठरविताना सन २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या प्रमाण मानण्यात येईल. अशा रितीने तयार होणारा निधी हा त्या त्या जिल्ह्याचा एकुण अनुज्ञेय निधी होईल. जिल्ह्याच्या अनुज्ञेय निधीचे सुत्र **परिशिष्ट-२** मध्ये विहित केले आहे.

४.	**परिशिष्ट - २** नुसार जिल्हयाच्या अनुज्ञेय निधीच्या ९० टक्के निधी स्वतंत्र व प्रादेशिक योजनांमध्ये समाविष्ट ग्रामपंचायतींसाठी देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान म्हणून उपलब्ध होईल. यामधून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या योजनांमध्ये समाविष्ट ग्रामपंचायतींचा अनुज्ञेय निधी वजा झाल्यावर उर्वरित निधी हा जिल्हा परिषद स्तरावर जिल्हा परिषदेच्या प्रादेशिक व स्वतंत्र ग्रामपंचायतींच्या योजनांमध्ये समाविष्ट ग्रामपंचायतींना परिशिष्ट ३(अ) मधील सुत्रानुसार अनुज्ञेय ठरेल.

५.	महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून चालविण्यात येणा-या योजनांसाठी शासन स्तरावरुन निधी उपलब्ध करून देण्यात येईल. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने त्यांचे मार्फत चालविण्यात येत असलेल्या स्वतंत्र व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांमध्ये मध्ये समाविष्ट ग्रामपंचायतींची लोकसंख्या, निर्देशित डोंगराळ भाग व **परिशिष्ट - १** मधील अन्य आवश्यक पात्रतेबाबतची माहिती जिल्हा परिषदेस व शासनास आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस तातडीने सादर करावी. जेणेकरुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या योजनांचे देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान जिल्हयांच्या अनुज्ञेय निधीतून वजा करुन, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उपलब्ध करुन देणे शक्य होईल.

६.	जिल्हा परिषदेकडून चालविण्यात येणा-या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांसाठी अनुज्ञेय ठरणारा निधी जिल्हा परिषदेस संबंधित ग्रामपंचायतींना **परिशिष्ट ३(अ)** मधील सूत्रानुसार अनुज्ञेय ठरणा-या निधीतून उपलब्ध होईल. हा निधी जिल्हा परिषदांनी या ग्रामपंचायतींच्या योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठीच वापरावा. तर, ग्रामपंचायतीकडून चालविण्यात येत असलेल्या योजनांसाठी अनुज्ञेय ठरणारा निधी जिल्हा परिषदांमार्फत ग्रामपंचायतींना उपलब्ध करुन देण्यात येईल. याव्यतिरिक्त देखभाल दुरुस्ती निधी संबंधित ग्रामपंचायतींना उपलब्ध होणार नाही.

७.	**परिशिष्ट - २** नुसार जिल्हयाला उपलब्ध झालेल्या एकुण निधीच्या १० टक्के निधी संबंधित जिल्हयातील पिण्याच्या पाणी पुरवठयासाठी निव्वळ हातपंप व वीजपंपावर अवलंबून असलेल्या ग्रामपंचायतींच्या पाणी पुरवठा व्यवस्थेच्या देखभाल दुरुस्तीसाठी परिशिष्ट ३(ब) मध्ये विहीत केलेल्या सुत्रानुसार वितरीत करावा. या निधीचे स्वतंत्र लेखे ठेवण्यात यावेत. अशा रितीने ज्या ग्रामपंचायतींना निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे, त्या ग्रामपंचायतींची तपशिलवार माहिती (गावे / वाडयांची नावे, लोक संख्या हातपंपाची / वीजपंपाची संख्या, पाणी पट्टीचा दर व वसूली.) **परिशिष्ट - ५** अन्वये सादर करावयाच्या माहितीसह दर तीन महिन्यांनी शासनास सादर करावी.

८.	संबंधित आर्थिक वर्षात ज्या स्वतंत्र व प्रादेशिक पाणी पुरवठा योजना **परिशिष्ट - १** मधील अटींची पुर्तता करतील अशा योजनांना देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान मिळण्यासाठीचे प्रस्ताव संबंधित ग्राम पंचायती / जिल्हा परिषदांनी जिल्हा परिषद पातळीवर कोणत्याही परिस्थितीत सप्टेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत सादर करावेत. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सदर प्रस्ताव पडताळून जिल्हा जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीच्या मान्यतेने या शासन निर्णयातील **परिशिष्ठ-३** मध्ये विहित केलेल्या सुत्रानुसार अनुदान वितरित करावे. ग्रामपंचायतीस एकुण अनुज्ञेय देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानापैकी ग्रामपंचायतीची पाणीपट्टीची वसूली जितकी असेल त्याप्रमाणात अनुदान वितरित करावे. (उदा.एखाद्या ग्रामपंचायतीची पाणी पट्टीची वसूली ४० टक्के असेल तर, **परिशिष्ट-३** अन्वये ग्रामपंचायतीस अनुज्ञेय ठरणाऱ्या एकूण अनुदानापैकी ४० टक्के अनुदान उपलब्ध होईल).

९.	महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने त्यांच्या योजनांमध्ये समाविष्ट ग्रामपंचायतींचा तपशिल परिच्छेद ५ मध्ये स्पष्ट केल्यानुसार कोणत्याही परिस्थितीत जून अखेर पर्यंत शासनास सादर करावा. प्राप्त माहितीची तपासणी करून या योजनांमध्ये समाविष्ट ग्रामपंचायतींची अनुज्ञेय अनुदान पात्रता शासन स्तरावर ठरविण्यात येईल. यानंतर अनुज्ञेय देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास शासन स्तरावरुन उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येईल. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने हे अनुदान संबंधित योजनांना वितरीत करुन त्याबाबतचा अहवाल शासनास दर तीन महिन्यांनी सादर करावा.

१०.	जिल्हा परिषदेने अनुज्ञेय अनुदानासाठी पात्र ठरलेल्या ग्रामपंचायतींना निधी उपलब्ध करून दिल्यानंतर शिल्लक राहणारा निधी **योजना नुतनीकरण निधी (Asset Renewal Fund)** म्हणून जिल्हा देखभाल दुरुस्ती निधी मध्येच वेगळयाने ठेवावा. सदर निधीच्या वापराबाबत सविस्तर आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

११.	ग्रामपंचायतींना निधीचे वितरण करणे सुकर व्हावे यासाठी प्रक्रियेच्या सुलभतेसाठी **परिशिष्ट -४** मधील उदाहरणाचा कृपया अभ्यास व्हावा.

१२.	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानाच्या वितरणा बाबतची माहिती **परिशिष्ट-५** मध्ये विहीत केल्यानुसार दर तीन महिन्यांनी शासनास सादर करावी.

१३.	जिल्हयांच्या अनुज्ञेय निधीमध्ये बदल करण्याचे अधिकार शासनास राहतील.

१४.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०२२८१५१२२७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

सही/-

**(अजित कुमार जैन)**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. अध्यक्ष , जिल्हा परिषद, (सर्व)
मा. मुख्य सचिव
विभागीय आयुक्त (सर्व)
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
जिल्हाधिकारी (सर्व)
प्रकल्प व्यवस्थापक, जलस्वराज्य प्रकल्प, सुधारणा सहाय व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, बेलापूर
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
प्रकल्प अधिकारी, आपलं पाणी प्रकल्प, सुधारणा सहाय व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, बेलापूर
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद, (सर्व)
तहसीलदार (सर्व)
गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने
कार्यक्रम समन्वयक, भारत निर्माण कक्ष, नविन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई
संगणक कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

# परिशिष्ट - १

**खाली नमूद केलेली पात्रता धारण करणाऱ्या** ग्रामपंचायती **देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान** मिळण्यासाठी पात्र आहेत. हे अनुदान प्राप्त करून घेण्यासाठी गावाने संबंधित जिल्हा परिषदेकडे विहित कालावधीत अर्ज करणे आवश्यक आहे.

**अनूदान प्राप्त होण्यासाठी पात्रता व पूर्ण करावयाच्या अटी :**

(१) गावाची जी पाणी पुरवठा व्यवस्था /योजना असेल तिचा लाभ ते गाव घेत असावे.

(२) देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करताना, शासन निर्णय दिनांक १४ डिसेंबर, १९९८ मधील तरतुदीनुसार ग्रामपंचायत स्तरावर ग्राम पाणी पुरवठा निधीचे स्वतंत्र बँक खाते उघडून त्यामध्ये नियमानुसार रकमा जमा करण्यात येत असाव्यात. अनुदान मागणी करताना लगतच्या वर्षात योजनेच्या लाभार्थ्यांवर शासन अधिसूचना दिनांक १७ जानेवारी, २००२ **व त्यात वेळोवेळी केलेल्या सुधारणे नुसार** विहीत केलेली **किमान अथवा त्यापेक्षा अधिक दराने पाणीपट्टी** आकारण्यात येत असावी.

(३) ग्रामपंचायतीची पाणीपट्टीची वसूली जितकी असेल त्याप्रमाणात ग्रामपंचायतीस एकुण अनुज्ञेय देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानापैकी अनुदान उपलब्ध होईल. (उदा.एखाद्या ग्रामपंचायतीची पाणी पट्टीची वसूली ४० टक्के असेल तर, परिशिष्ट-३ अन्वये ग्रामपंचायतीस अनुज्ञेय ठरणा-या एकूण अनुदानापैकी ४० टक्के अनुदान उपलब्ध होईल. )

(४) संबंधित गावातील पाणी पुरवठा व्यवस्था / योजना गावाने हस्तांतरीत करून घेतलेली असावी. प्रादेशिक योजनांच्या बाबतीत संबंधित जिल्हा परिषदेने योजना ताब्यात घेतलेली असावी. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून चालविण्यात येत असलेल्या योजनांच्या बाबतीत ग्रामपंचायतींना अनुज्ञेय ठरणारे अनुदान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात येईल.

(५) मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ च्या सुधारित कलम ४९ नुसार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती गठित करून योजनेची देखभाल व दुरूस्ती या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत करण्यात येत असावी.

(६) संबंधित ग्रामपंचायतीने सन २०१० पर्यंत संपूर्ण गाव हांगदरी मुक्त करण्याबाबतचा ठराव ग्रामसभेमध्ये करून घ्यावा. त्याअनुषंगाने पुढील तीन वर्षासाठी कृती कार्यक्रम ठरवावा.

(७) संबंधित ग्रामपंचायतीने पाणी पुरवठा योजने अंतर्गत वितरणासाठी मीटर पध्दती लागू करावी व त्याची अंमलबजावणी आर्थिक वर्ष २००८-२००९ पासून **सुरु करुन २००९-२०१० पर्यंत पूर्ण करण्यात येईल** अशा आशयाचा ठराव ग्रामसभेमध्ये करुन घ्यावा. यासाठी ग्रामस्थांचे योग्य ते लोकप्रशिक्षण करावे.

(८) योजनेच्या पाणीपट्टीच्या दरात दरवर्षी वाढ करून व पाणीपट्टीची वसूली वाढवून, पाणीपट्टीची आकारणी व वसूली पुढील **तीन** वर्षात योजनेच्या देखभाल व दुरूस्तीच्या खर्चाच्या प्रमाणात करण्याबाबत ग्रामसभेचा ठराव केलेला असावा.

(९) योजनेद्वारे उपलब्ध होणारे पाणी, पाण्याचा व्यय आणि योजनेद्वारे लाभार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचा हिशोब ग्रामपंचायतीने स्वतंत्रपणे ठेवावा. पाण्याची गळती रोखण्यासाठी तसेच पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने लागू करण्याबाबत ग्रामसभेत ठराव घेण्यात यावा.

(१०) पहिल्या वर्षी म्हणजे सन २००८- ०९ मध्ये वरील (२),(३), (४), (५) व (६) मधील निकषानुसार संबंधित ग्रामपंचायत **देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान** मिळण्यासाठी पात्र ठरेल. परंतु, त्यापुढील वर्षापासून म्हणजे सन २००९- १० पासून वरील (६) व (७) येथील ग्रामसभेच्या ठरावानुसार दरवर्षी करावयाची कार्यवाही झाल्यानंतरच संबंधित ग्राम पंचायत **देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदानासाठी** पात्र होईल.

*********************

## परिशिष्ट- २

### जिल्ह्याला अनुज्ञेय होणाऱ्या निधीचे सूत्र

राज्यास संबंधित आर्थिक वर्षात देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान देण्यासाठी उपलब्ध असलेला निधी जिल्ह्यांना पुढील प्रमाणे अनुज्ञेय ठरेल.

(अ) एकूण उपलब्ध निधीपैकी ८० टक्के निधी सर्व जिल्ह्यांना त्यांच्या ग्रामीण लोकसंख्येच्या प्रमाणात उपलब्ध होईल.

(ब) एकूण उपलब्ध निधीपैकी २० टक्के निधी राज्य शासनाने निर्देशित केलेल्या डोंगराळ जिल्ह्यांना त्यांच्या डोंगराळ लोकसंख्येच्या प्रमाणात उपलब्ध होईल.

$$\textbf{अ} = \text{राज्याच्या एकूण उपलब्ध निधीच्या ८० टक्के} \times \frac{\text{जिल्ह्याची ग्रामीण लोकसंख्या}}{\text{राज्याची ग्रामीण लोकसंख्या}}$$

$$\textbf{ब} = \text{राज्याच्या एकूण उपलब्ध निधीच्या २० टक्के} \times \frac{\text{जिल्ह्याची डोंगराळ ग्रामीण लोकसंख्या}}{\text{राज्याची डोंगराळ ग्रामीण लोकसंख्या}}$$

**जिल्हयाचा प्रत्यक्ष अनुज्ञेय ठरणारा निधी (क)** = परिशिष्ट २ अन्वये जिल्हयाचा अनुज्ञेय निधी (अ) च्या ९० टक्के (-) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या योजनांमध्ये समाविष्ट ग्रामपंचायतींना शासन स्तरावरुन प्रत्यक्ष अनुज्ञेय ठरणारा निधी.

**जिल्हयाचा प्रत्यक्ष अनुज्ञेय ठरणारा निधी (ड)** = परिशिष्ट २ अन्वये जिल्हयाचा अनुज्ञेय निधी (ब) च्या ९० टक्के (-) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या योजनांमध्ये समाविष्ट ग्रामपंचायतींना शासन स्तरावरुन प्रत्यक्ष अनुज्ञेय ठरणारा निधी.

************************

# परिशिष्ट-३

## अ) स्वतंत्र व प्रादेशिक योजनांसाठी ग्रामपंचायतींना उपलब्ध करून द्यावयाच्या अनुज्ञेय देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान वाटपाचे सुत्र

ग्रामपंचायतीचा हिस्सा **(इ)** = परिशिष्ठ २ मधील (क) नुसार उपलब्ध निधी x ग्रामपंचायतीची लोकसंख्या / जिल्हयातील एकूण ग्रामीण लोकसंख्या

ग्रामपंचायतीचा हिस्सा **(फ)** = परिशिष्ठ २ मधील(ड)नुसार उपलब्ध निधी x डोंगराळ ग्रामपंचायतीची लोकसंख्या / जिल्हयातील एकूण डोंगराळ ग्रामीण लोकसंख्या

(ग्रामपंचायत निर्देशित डोंगराळ भागात असल्यास)

*** ग्रामपंचायतीस अधिकतम अनुज्ञेय अनुदान = (इ) + (फ)**

## ब) वीज पंपांवर / हातपंपांवर अवलंबून असलेल्या ग्रामपंचायतींना उपलब्ध करून द्यावयाच्या अनुज्ञेय देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान वाटपाचे सुत्र

ग्रामपंचायतीचा हिस्सा = परिशिष्ट २ मधील (अ) नुसार उपलब्ध निधीच्या १० टक्के x ग्रामपचांयतीची लोकसंख्या / जिल्हयातील हातपंपावर /वीजपंपांवर अवलंबून असलेल्या ग्रा.प.ची एकूण लोकसंख्या

ग्रामपंचायतीचा हिस्सा = परिशिष्ट २ मधील (ब) नुसार उपलब्ध निधीच्या १० टक्के x ग्रामपचांयतीची लोकसंख्या / जिल्हयातील हातपंपावर /वीजपंपांवर अवलंबून असलेल्या ग्रा.प.ची एकूण लोकसंख्या

***ग्रामपंचायतीस अधिकतम अनुज्ञेय अनुदान = (इ) + (फ)**

*** ग्रामपंचायतींचे अधिकतम अनुज्ञेय अनुदान हे त्या ग्रामपंचायतीची पाणीपट्टीची वसूली जितकी टक्के असेल त्या प्रमाणात त्या ग्रामपंचायीतस उपलब्ध होईल.**

*************************

# परिशिष्ट-४

## कार्यवाहीच्या सुलभतेसाठी उदाहरण पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

क्ष हा जिल्हा डोंगराळ आहे.
या जिल्ह्याचा आर्थिक वर्ष २००८- ०९ साठीचा परिशिष्ट २ मधील (अ) नुसार अनुज्ञेय निधी रु.१५०.०० लक्ष व डोंगराळ जिल्हा असल्यामुळे परिशिष्ट २ मधील (ब) नुसार अनुज्ञेय निधी रु.३०.०० लक्ष इतका आहे.
जिल्हयातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या योजनांमधील समाविष्ट ग्रामपंचायतींसाठीचा शासन स्तरावरुन प्रत्यक्ष अनुज्ञेय ठरणारा निधी वजा जाता परिशिष्ट २ मधील (क) नुसार जिल्हयाचा प्रत्यक्ष अनुज्ञेय ठरणारा निधी रु.१००.०० लक्ष तर (ड) नुसार रु.१०.०० लक्ष इतका आहे.
हातपंपावर विद्यूत पंपावर अवलंबून असलेल्या गावे /वाड्यांसाठी परिशिष्ट २ मधील (अ) च्या १० टक्के म्हणजे रु.१५.०० लक्ष
पात्र स्वंतत्र व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनामध्ये समाविष्ट ग्रामपंचायतींसाठी प्रत्यक्ष अनुज्ञेय निधी परिशिष्ट २ मधील (क) नुसार रु.१००.०० लक्ष तर (ड) नुसार रु.१०.०० लक्ष इतका आहे.
ग्रामपंचायतीची लोकसंख्या = ५०००
ग्रामपंचायतीची पाणीपट्टीची वसूली = ४५ टक्के
जिल्ह्याची डोंगराळ लोकसंख्या = ७,००,०००
जिल्ह्याची ग्रामीण लोकसंख्या = २०,००,०००

**सुत्रानुसार या ग्रामपंचायतीस उपलब्ध होणारे अधिकतम अनुदान**

ग्रामपंचायतीचा हिस्सा **(इ)** = परिशिष्ठ २ मधील (क) नुसार उपलब्ध निधी x (ग्रामपंचायतीची लोकसंख्या / जिल्हयातील एकूण ग्रामीण लोकसंख्या)

ग्रामपंचायतीचा हिस्सा **(फ)** = परिशिष्ठ २ मधील (ड)नुसार उपलब्ध निधी x (डोंगराळ ग्रामपंचायतीची लोकसंख्या / जिल्हयातील एकूण डोंगराळ ग्रामीण लोकसंख्या)
(ग्रामपंचायत निर्देशित डोंगराळ भागात असल्यास)

**ग्रामपंचायतीस अधिकतम अनुज्ञेय अनुदान = (इ) + (फ)**

ग्रामपंचायतीचा हिस्सा (इ) = रु.१,००,००,००० X (५,००० / २०,००,०००) = रु. २५,०००/-

ग्रामपंचायतीचा हिस्सा (फ) = रु.१०,००,००० X (५,००० / ७,००,०००) = रु. ७,१४३/-

ग्रामपंचायतीचा अधिकतम अनुज्ञेय अनदान = (इ) + (फ) = ३२,१४३/-

या ग्रामपंचायतीची पाणीपट्टीची वसूली ४५ टक्के असल्याने, या ग्रामपंचायतीस वरील प्रमाणे उपलब्ध होणा-या अधिकतम अनुज्ञेय अनुदानाच्या ४५ टक्के म्हणजेच रु.१४,४६४/- इतके देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान अनुज्ञेय ठरेल.

************************

# परिशिष्ट -५

| | | |
|---|---|---|
| जिल्ह्याला उपलब्ध होणा-या देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानातून झालेल्या खर्चाचा तपशील दर्शविणारे विवरण पत्र | | |
| (ही माहिती सर्व जिल्ह्यांनी दर तीन महिन्यांनी शासनास सादर करावयाची आहे) | | |
| अनु.क्र. | | रु.लक्षमध्ये |
| १ | जिल्हा | |
| २ | आर्थिक वर्षामध्ये जिल्हा परिषदेने जिल्हा देखभाल दुरुस्ती निधीमध्ये जमा केलेली रक्कम | |
| ३ | परिशिष्ट २ नुसार जिल्ह्याचा एकूण अनुज्ञेय निधी | |

| | | |
|---|---|---|
| ४ | स्वतंत्र व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांसाठी ग्रामपंचायतींना वाटप करावयाचा जिल्ह्याचा एकूण अनुज्ञेय निधीच्या ९० टक्के निधी. | |
| ४.१ | वरीलपैकी वितरणयोग्य निधी | |
| ४.२ | वितरित निधी | |
| ४.३ | वितरित निधीतून झालेला खर्च | |
| ४.४ | उर्वरित निधी | |

| | | |
|---|---|---|
| ५ | हातपंपावर / वीज पंपावर अवलंबून असलेल्या ग्रामपंचायतींना वाटप करावयाचा जिल्ह्याच्या एकूण अनुज्ञेय निधीच्या १० टक्के निधी. | |
| ५.१ | वरीलपैकी वितरणयोग्य निधी | |
| ५.२ | वितरित निधी | |
| ५.३ | वितरित निधीतून झालेला खर्च | |
| ५.४ | उर्वरित निधी | |

| | | |
|---|---|---|
| ६ | योजना नुतनीकरण निधीमध्ये एकूण जमा निधी (४.४ + ५.४) | |
| ६.१ | योजना नुतनीकरण निधीतून झालेला खर्च | |
| ६.२ | योजना नुतनीकरण निधीमध्ये शिल्लक निधी | |